महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/रस्ता दुरूस्ती नाहरकत/ ९२ /२०२३ दि. २१/०६/२०२२

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी**, कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीत **'बकरी ईद'** हा मुस्लीम बांधवांचा सण **(चंद्र दर्शनानुसार)** दि. २९/०६/२०२३ रोजी किंवा दि. ३०/०६/२०२३ रोजी साजरा करण्यात येणार आहे. सदर सणानिमित्त कल्याण शहरातील दुर्गाडी इदगाह समोरील मुख्य रस्त्यावर सार्वजनिक नमाज पठणाचा कार्यक्रम होत असतो. तसेच त्याच दिवशी व त्याचवेळी शिवसेना पक्षा तर्फे दुर्गाडी किल्ल्यावर दुर्गामाता मंदिरात घंटानाद कार्यक्रम केला जातो. सदरवेळी हिंदु कार्यकर्त्यांना लाल चौकी–दुर्गामाता चौकादरम्यान रस्त्यावर बॅरिकेटींग करुन अटकाव केला जातो. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण शहरातील लालचौकी कडून भिवंडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना लालचौकी येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने लालचौकी येथून उजवे वळण घेवून आधारवाडी चौक – वाडेघर सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) भिवंडी कडून कल्याण शहरातील आग्रा रोड मार्गे व गोविंदवाडी बायपास मार्गे कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना दुर्गामाता चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदची वाहने दुर्गामाता चौक येथून डावे वळण घेवून वाडेघर सर्कल – आधारवाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) कल्याण (पुर्व) कोळशेवाडी बाजू कडून गोविंदवाडी बायपास मार्गे दुर्गामाता चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना पत्रीपूल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने पत्रीपूल – शिवाजी चौक – लाल चौकी येथून उजवे वळण घेवून आधारवाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) कल्याण शहराअंतर्गत दुर्गाडी चौक – गोविंदवाडी बायपास – पत्रीपुल मार्गे व दुर्गाडी चौक – शिवाजी चौक – पत्रीपुल मार्गे जाणाऱ्या कंटेनर, ट्रेलर, इत्यादी मल्टीएक्सल, जड, अवजड वाहनांच्या वाहतूकीस **'बकरी ईद'** चे दिवशी दिवसा व रात्री सर्व वेळी **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना बकरी–ईद सणाचे दिवशी **(चंद्र दर्शनानुसार)** दि. २९/०६/२०२३ रोजी किंवा दि. ३०/०६/२०२३ रोजी रात्री ००.०० ते नमाजाचा कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CS CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर .

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.

मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका.

विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, कल्याण.

नियंत्रण कक्ष, ठाणे शहर.

**<u>प्रत</u>** :– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.</u>

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– सपोआ–कल्याण व भिवंडी श.वा.शा.

प्रभारी अधिकारी, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली, कोनगाव, भिवंडी वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.

CS CamScanner